# छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत संत तुकारामांचे साहित्यिक योगदान

# Literary Contribution Of Sant Tukaram in Establishing Swaraj by Shree Chatrapati Shivaji Maharaj

{यू.जी.सी.व्दारा अनुदान प्राप्त लघुशोध प्रकल्प. वर्ष २०११ ते २०१३}

**प्रा. डॉ. वर्षा तोडमल**

मराठी विभाग

आबासाहेब गरवारे महाविद्यालय,कर्वे रोड ,पुणे—४

संत तुकारामांच्या कालखंडात परकीय सत्तेचा संघर्ष तीव्र झाला होता.मराठी मुलुख चार मुस्लीम शासकांमध्ये वाटला जाऊन सत्ता स्पर्धा विकोपाला गेली होती.मराठी सरदार आपापसात भांडून ह्या सत्तांना बळकटी देत होते.अशा परिस्थितीत शिवरायांनी स्वराज्य स्थापनेचा संकल्प सोडला. तुकारामांच्या कालखंडातच इ.स.१६३६ ते १६४५ पर्यंत छत्रपती शिवरायांचे वास्तव्य पुण्यातच होते. प्रशासन व युध्दकलेचे शिक्षण त्यांनी याच काळात घेतले. इ.स.१६३० ते १६४९ या काळात तुकारामांच्या कीर्तनाने जागृती झालेला बराचसा प्रदेश छत्रपती शिवरायांच्या स्वराज्यात मोडत होता. पुण्याहून १५ कि.मी.अंतरावर तुकारामांचे वास्तव्य 'देहू' या ठिकाणी होते. स्वत: छत्रपती शिवरायही कित्येक वेळा तुकारामांच्या कीर्तनाला उपस्थित असत.

छत्रपती शिवरायांच्या कृतीवर तुकारामांच्या शिकवणुकीचा जेवढा प्रभाव पडलेला दिसून येतो तेवढा दुसऱ्या कोणत्याही संताचा किंवा स्वामींचा दिसत नाही. संत तुकाराम आणि शिवरायांचे कार्य हे परस्परपूरक होते. हे अमान्य करता येत नाही. संत तुकोबाराय महाराष्ट्राच्या आध्यात्मिक समतेच्या लोककेंद्री तत्त्वज्ञानाची मांडणी ज्यावेळी करत होते. त्यावेळी छत्रपती शिवराय आठरापगड जातींचा एकमेळ साधणाऱ्या महाराष्ट्र धर्माची राजकीय बांधणी करण्यात मग्न होते. तुकोबारायांना शिवरायांच्या या कार्याची जाण होती. लष्करी आणि प्रशासकीय पातळीवर राष्ट्रबांधणी करणाऱ्या राजाला प्रतिसाद देण्यासाठी समंजस व डोळस प्रबोधनकर्त्यांची आणि संत—महात्म्यांची आहे, हे तुकोबारायांनी ओळखले होते. त्यामुळे शिवरायांच्या महाराष्ट्र—धर्माच्या जडणघडणीत तुकोबारायांनी आपल्या सामाजिक प्रबोधनकर्त्यांची बाजू नेमकेपणाने उचलली आणि आठरापगड जातींमध्ये सामाजिक समतेचा आणि आध्यात्मिक एकतेचा मंत्र पोहचविला. राजप्रलोभनांना बळी न पडता,किंबहुना या राजप्रलोभनांपासून कटाक्षाने दूर राहण्याची काळजी घेऊन तुकोबारायांनी आपले राष्ट्रकर्तव्य निभावले. छत्रपती शिवरायांना केलेल्या उपदेशातून तुकोबारायांनी अप्रत्यक्षपणे आदर्श राजनीतितल्या तत्वज्ञानाचा 'राजबोध' केला असे म्हणता येईल.

परकीय आक्रमणांचा सुळसुळाट, त्यातून होणारी लुटालूट, दुष्काळामुळे झालेली अन्नान्न दशा, सत्तांध आणि सावकारांकडून होणारे शोषण, सत्तेशी लाचारी पत्करुन उद्दामपणे जगणारे धनदांडगे यामुळे बहुतांश प्रजा दु:ख,दैन्य दारिद्र्य यात खितपत होती. आर्थिक नागवणुकीने कुळधर्म, कुलाचार, पाहुणचार या गोष्टी भागविण्याबरोबरच दैनंदिन भोजनादी गोष्टी भागवण्याची मारामार झालेल्या जनतेला भक्ती, अध्यात्म, निखळ शरण्यभाव या गोष्टींपेक्षा नवससायास, मंत्रतंत्र, जादुटोणे अधिक सुचू लागले. कुपोषणाने अनारोग्याचे संकट विक्राळ बनले. अशा परिस्थितीमध्ये श्री तुकारामांनी भगवत्भक्ती, श्रध्दा जागवून लोकांना बुभुक्षिततेपासून मुक्त करण्याचा प्रयास केला.[१] सदवर्तन, सदाचार, संयम, श्रध्दा आणि भक्ती यामुळे परिस्थितीवर मात करता येते, हे त्यांनी स्वत:च्या वर्तनातून आणि उदाहरणातून दाखवून दिले. प्राप्त परिस्थितीला संयमाने आणि सामर्थ्याने सामोरे जाण्याशिवाय पर्याय नसतो.श्रीतुकाराम लोकांना जिद्दीने आणि आत्मबलाने परिस्थितीवर मात करता येते हे दाखवून देतात.

संत, तत्त्वज्ञ, कवी तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करावयाचा म्हणजे तो त्रिविधतेने केला पाहिजे हे खरे. साहित्य हा साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रकर्ष असतो ते त्याचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व असते; की वाङ्मयातून त्याचे व्यक्तिमत्त्व सूचित होते? वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा विचार करावयाचा म्हणजे;कलावंताच्या प्रतिभाजन्य कलाविष्काराचा विचार करावयाचा. तुकाराम महाराजांचा असा अभ्यास करुन तुकाराम उलगडण्यास चांगली मदत होते हे खरे;तथापि वाङ्मयातून सूचित झालेल्या व्यक्तिमत्त्वाचे चिंतन केले; तर तुकारामांचे अधिक चांगले दर्शन घडते.

तुकारामांचे व्यक्तिमत्त्व लौकिक परिस्थितीकडे जेवढ्या सत्यशोधक दृष्टीने पहात होते,तेवढीच अध्यात्मविद्येची अलैाकिक संवेदना त्यांच्या अस्तित्वाला व्यापून होती.त्यामुळे भौतिक जीवनाला अध्यात्माचा आधार देऊन; ते कीर्तन प्रवचन,अभंगगायन करतात हे लक्षात घेतले पाहिजे.

शिवाजींचा जन्म हा इ.स. १६२७ आणि तुकोबांचा जन्म इ.स. १६०८ मध्ये झााल्याचे लक्षात घेतले, की तुकोबा शिवाजीपेक्षा १९ वर्षांनी मोठे होते.[२] पुणे हे शिवाजीच्या जहागिरीचे केंद्र होते. वारंवार पुण्यावर मुघल आणि आदिलशहाच्या स्वाऱ्या झाल्या. शिवाजींकडे पुणे, सुपे, चाकण व इंदापूर या परगण्यांची जाहगीर होती. परंतु जहागिरीतील किल्ले मात्र विजापुरच्या आदिलशहाच्या ताब्यात होते. शिवाजींनी इ.स. १६४५ मध्ये स्वराज्य स्थापनेची प्रतिज्ञा केली. तेव्हा शिवाजीचे वय १८ वर्षांचे होते. आपल्या मावळयांच्या भरवशावर शिवाजीने प्रथम तोरणा किल्ला हस्तगत केला. शिवाजीच्या मराठा स्वराज्य स्थापनेस, खऱ्या अर्थाने प्रारंभ झााला. नंतर शिवाजीची सरशी निजाम, आदिलशहा आणि मुगलांनाही थांबवता आलेली नाही.

शिवाजींनी मराठा स्वराज्य स्थापनेसाठी जे राजकारण केले आणि प्रचंड असा पराक्रम केला, त्याचा इतिहास सर्वज्ञात आहे. शिवाजी समतावादी आणि मानवतावादी थोर राजा होता, हेही आता सर्वमान्य झालेले आहे. शिवाजींनी जेव्हा स्वराज्याचे कार्य केले, तेव्हा तुकोबांची आणि शिवाजींची भेट इ.स १६४५ नंतर गृहीत धरली, तरी जवळपास तुकोबांच्या मृत्यूपर्यंत म्हणजेच इ.स. १६५० पर्यंत तरी शिवाजी आणि तुकोबांच्या भेटी होत असाव्यात. दोघात यथोचित असा संवादही होत असावा. शिवाजी आणि तुकोबांची भेट झाली होती. त्यांच्यात परस्परसामंजस्य होते, याविषयी अनेक ऐतिहासिक पुरावेही उपलब्ध आहेत. [३]

बाराव्या शतकामध्ये कवी मुकुंदराजापासून सुरु झालेल्या मराठी काव्यपरंपरेत संत ज्ञानेश्वरांनी साहित्य सोनियाच्या खाणी उघडल्या, भक्तीत दंग झालेल्या नामदेवांची साधीभोळी कविता भावकविता म्हणून मराठीत अमर झाली. नाम्याच्या संतमेळ्यातील गोराकुंभार, चोखा महार, सावतामाळी, जनाबाई वगैरे सर्वांनीच आपली भक्ती, देवाबद्दलचे प्रेम कवितेतच शब्दबध्द केले. विविध रसांचा परिपोष साधला, 'नाम्याचा तुका' म्हटल्या जाणाऱ्या तुकारामांनी नामदेवांची भावकविता विकसित केली.

संत तुकारामांचे अभंग हे त्यांचे आत्मचरित्र आहे. साधासुधा सांसारिक माणूस **'अणुरेणु या थोकडा'** या सिध्दावस्थेपर्यंत कसा पोहोचला याचा तो भावालेख आहे. त्यांच्या अभंगाने त्यांच्या सर्व मनोवस्था सारख्याच बलाने पेलल्या होत्या. सिध्दावस्थेत – "उरलो उपकारापुरता" या अवस्थेतील त्यांचे उपदेशात्मक अभंग म्हणजे अंतरीच्या उमाळ्याने लोकहिताच्या कळकळीने बाहेर पडलेले – हृदयीचे बोल होते.

संत तुकाराम अपाठीक असल्याने सुरुवातीची **"माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार मज विश्वंभर बोलवितो"** (अभंग क्र. – १००७) असे भीतभीत म्हणणारे, स्वत:कडे कमीपणा घेऊन केलेली रचना व उत्तर रंगातील स्वत:च्या निर्मिती प्रक्रियेची पुरी जाणीव झाल्यावरची "तुका म्हणे झरा। आहे मुळचाच खरा।।" असे अत्यंतिक अभिमानाने म्हणणारी आत्मविश्वासाची रचना हे दोन भिन्न प्रवाह हे संत तुकारामांच्या अभंगाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.[४]

## संत तुकारामांचे पाईकाचे अभंग – (निवडक अभंगांचा अर्थ)

संत तुकारामांचे पाईकाचे अभंग या सदराखाली अभंगगाथेत एकोणीस (१९) पाईकाचे अभंग आहेत. पाईक म्हणजे विश्वासू सेवक किंवा पायदळातील शिपाई होय.

पाईकाचे अभंग रुपकात्मक असून भक्त व वीर यांचे त्यात साम्य दाखविले आहे. भक्त एकनिष्ठपणे देवाची सेवा करुन संकटसमयी न डगमगता टाकीचे घाव सहन करुन संत पदवी पावतो. अधर्माच्या वाटा मोडून टाकतो, लोकांना परमार्थाचा मार्ग दाखवितो. सज्जनांना सारथ्य करुन उत्तेजन देतो. दुर्जनांचे ताडन करतो. दांभिकांचा दंभस्फोट करतो आणि अखेर बिजपदाचा उपभोग घेतो. हे रुपकाद्वारे संत तुकारामांनी पाईकाच्या अभंगात दाखविले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांच्या जीवाला जीव देणारे सरदार व विश्वासू मावळे यांना उद्देशून हे अभंग लिहिले आहेत. १७ व्या शतकातील लढाईचे डावपेच शिवाजीच्या सरदारांची व अनुयायांची स्वामीभक्ती व मावळ्यांचा विश्वासूपणा यांचे या अभंगात हुबेहुब चित्र रेखाटले आहे.

संत तुकारामांनी आपल्या तेजस्वी वाणीने देशभक्तांस, वारकऱ्यांस व धारकऱ्यांस उपदेश केला आहे. **'पाईक' (शिपाई, गडी, वीर)** जीवाचा उदार असतो. तो धन तृणवत व सोने पाषाणासमान मानतो. पाईकी वाचून प्रजेच्या दु:ख – क्लेशांचे निवारण होत नाही. 'देह मी नव्हे' असा एका क्षणाचा निर्धार करुन पाईक अविनाशी सुखाचा धनी होतो. पाईक, स्वामीपुढे सत्याचे भांडण करण्यास कचरत

नाही. पाईक अंतर्बाह्य शूर असतो. मनाशी व जनाशी धैर्याने लढत असतो. परक्याचा साठा मोडून, कामक्रोधादी आगंतुकांना धुडकावून लावून तो स्वजनांचे, आत्मधर्माचे रक्षण करतो, स्वामीवर अचल विश्वास ठेवल्यानेच पाईकाला मोल चढते. जातीचा पाईक खऱ्या अर्थाने पाईकांना ओळखतो. म्हणूनच संत तुकाराम निर्भय पाईकांविषयी अभंग लिहितात, ते म्हणतात — 'भांडायचे लढायचे झाले तर निर्भयपणाने मुख्यांशीच गाठ ठेवावी, गवळ्याच्या नादी लागू नये.'

**१"येऊ ने दावी पुढती। आड भयाची ते जाती।।धृ।। "भांडणेची झाले। मग जीवांचे काय चाले?।।१ ।।**

लोहगाव मुक्कामी तुकोबांचे कीर्तन होते. शिवाजीराजे कीर्तनाला आले ही बातमी शत्रूंना कळताच, आक्रमकांनी राजांना पकडण्यासाठी वेढा टाकला, त्या क्षणीचा तुकोबांचा आकांत जीवघेणा होता. श्री छत्रपती शिवरायांना कीर्तनात सांभाळण्याचा अट्टाहास त्यांनी पांडुरंगापुढे केला, आकांताने समूहगायनाच्या गजरात ते पांडुरंगास म्हणाले

**'भजनी विक्षेप तेंचि पै मरण। न वाजवा तो क्षण एक वाया ।।३।।**

**तुका म्हणे नाही आघताचा वारा । ते स्थळी दातारा ठाव मागे' ।।३।। ( अ.क्र.२७६)**

सर्वांभूती परमेश्वराची प्रचिती छत्रपतींच्या रुपाने देऊन अश्रध्द आक्रमकांना श्रीतुकारामांनी भयचकित करुन सोडले.

२ **"न देखवे डोळा ऐसा हा अकांत। पर पीडे चित्त दुःखी होते"**

**"भीत नाहीं आतां आपुल्या मरणा। दुःखी होता जना न देखवे।"** ५

अरे माझ्या मरणाचे मला भय नाही, पण ह्या लोकांचे दुःख पाहवत नाही. आम्हा हरिभक्तांचा जो जीवनधर्म आहे, हे तू कसे समजून घेत नाही? कीर्तनामध्ये अडथळा येणे हेच खरे तर मरण, भक्तीमध्ये तर क्षण वाया जाऊ नये, विक्षेप येऊ नये, दुःख संकटांचा — जरासुध्दा वारा लागू नये म्हणून असे स्थान (राष्ट्र) तू निर्माण करावे, ही माझी मागणी आहे.

३ **"काय म्या मानावे ती हरिकथेचे फळ। तरि जे सकळ जनी ऐसे।।**

**........................ तेथे तुझा वास कैसा आतां।।"**

हरिकीर्तनात विक्षेप येणे हेच माझ्या भक्तीला आलेले फळ समजावे काय? जनजीवनाच्या उच्छेदाला आरंभ झाला आहे. हे या परचक्रावरुन स्पष्ट होते पापच जणू काही पुढे येते आहे असा अनुभव प्रसंगरुपाने आला, भक्ताच्या व भक्तीच्या ठिकाणी तुझे अधिष्ठान असते हे खरे कसे समजावे? असते तर असे संकट आलेच नसते.

४ **"एका बीजा केला नास। मग भोगले कणीस।।**

**तुका म्हणे रणीं। जीव देतां लाभ दुणी।।"**,

कोणत्याही संकटप्रसंगी केवळ आकांत करणे, आक्रोश व्यक्त करणे हा तुकोबांचा पिंडच नव्हे, जमेल तशा पध्दतीने तुटून पडणारे संकटांच्या विरोधात आघाडी उघडणारे कृतिशूर

पुरुष होते ते, त्याने आपल्या कथाकीर्तनातून लोकजागृतीचे कार्य आरंभले, त्यामुळे आषाढी – कार्तिकीला पंढरीची वारी करणारे लाखो वारकरी शिवरायांच्या स्वप्नासाठी धारकरी बनले.

**"आम्ही विठ्ठलाचे वीर। फोडून कलिकाळाचे शीर।"**

या आवेशाने तुटून पडले. '**दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दालन कंटकांचे**' ही आज्ञा त्यांनी तुकोबांकडून मिळविली होती. यावरुन तुकोबांचे अभंग त्वेषपूर्ण असल्याचे लक्षात येते.

शेत पेरणारा एक बीज मातीत घालतो, तो बिजाचा नाश नसतो, तर अनेक दाणे देणारे कणीस मिळवायची ती प्रक्रिया असते, हे तर लहान थोरांना सर्वांनाच कळते. जीवनात काहीतरी गमावल्याखेरीज काहीतरी मिळत नसते, त्यागाशिवाय काहीही न मिळणे हा निसर्गाचा नियम आहे, तद्वतच जो पुरुष रणामध्ये आपला जीव देतो, देशासाठी आत्मबलिदान करतो त्यालाच खरी कीर्ती प्राप्त होते.

५ **"पाईक तो प्रजा राखोनिया कुल। पारखिया मूळ छेदी दुष्टा।।धृ।।**
**तो एक पाईक पाइका नाईक। भाव सकळीक स्वामिकाजी।।१।।**
**तृणवत तनु सोने ज्या पाषाण। पाइका त्या भिन्न नाहीं स्वामी।।२।।**
**विश्वासावाचूनि पाईकासी मोल। नाही मिथ्या बोल बोलिलिया।।३।।**
**तुका म्हणे नये स्वामी उणेपण। पाइका जतन करी त्यासी।।४।।"**

परके सैन्य दृष्टीस पडताच त्यांचा नाश करुन जो प्रजेचे रक्षण करतो तोच खरा पाईक (सैनिक) होय आणि असाच पुरुष सैनिकाचा अधिपती (पाईकांचा नाईक) ठरुन स्वामीला प्रिय होतो. त्याला स्वत:चा देह तृणवत असतो, तसे सोन्यारुपाला दगडापेक्षा जास्त किंमत देत नाही, कारण स्वामीकार्य त्याच्यासाठी सर्वश्रेष्ठ असते. पाईकाचा धन्यावरील विश्वास, स्वामींच्या कार्यावरील निष्ठा हे सर्वश्रेष्ठ मूल्य पराक्रमातून साध्य होते, ते व्यर्थ बडबडीतून नव्हे. स्वामीच्या कार्याला कोणत्याही प्रकारे उणेपणा येणार नाही याची जो काळजी घेतो तोच खरा सेवक.

६ **"पाईकीचे सुख पाईकासी ठावे। म्हणोनिया जीवे केली साटी।।धृ।।**
**येता गोळ्या बाण साहिले भडिमार। वर्षता अपार वृष्टिवरी।।१।।**
**स्वामीपुढे व्हावे पडता भांडण। मग त्या मंडन शोभा दावी।।२।।**
**पाईकांनी सुख भोगिले अपार। शुध्द आणि धीर अंतर्बाही।।३।।**
**तुका म्हणे या सिध्दांताच्या खुणा। जाणे तो शहाणा करी तो भोगी।।४।।**

अशा सेवेचे, स्वामीनिष्ठेचे सुख खऱ्या अर्थाने सेवकालाच समजते. म्हणून तर तो जीवावर सुध्दा उदार होतो, गोळ्या, बाण ह्यांची अपार वृष्टी जो सहन करतो, भांड्याच्या भडिभारात स्वामीच्या पुढे असतो. त्याच्याच अंगावर शूरत्वाचे अलंकार शोभतात. जो धैर्य धरु शकतो, पराक्रम गाजवितो त्यालाच अपार सुखप्राप्ती होते, ह्या सगळ्या वीरवृत्तीच्या खुणा आहेत. जो खरा शहाणा असेल तो समजून घेईल व स्वामीकार्य करेल.

७ **“वाखर घेऊनि आले। त्यासी तखारेने हाले।।धृ।।**

**नव्हे आपुले उचित। करुनि टाकावे फजित।।१ ।।**

**अंगुलिया गोडी। त्यासी काय सिलें घोडी।।२।।**

पराक्रम रणात गाजवायचा असतो. शौर्य बरोबरीच्यालाच दाखवायचे असते. गरज नसेल तेव्हा दुबळ्यावर शौर्य गाजवणे अस्थानी होय, हेही तुकोबा आवर्जून सांगातात. ह्या अभंगात तुकोबांनी पुढील दृष्टांत दिला आहे.

एक सामान्य न्हावी शूर शिपायाच्या अंगांवर वस्तरा घेऊन धावला, ते पाहून शिपायाने तलवार उपसली. अशावेळी तलवार घेऊन धावणे योग्य नव्हे, नाव्ह्याला केवळ दरडावले तरी त्याचा आवेश गळून पडेल, रागे भरुन नुसती बोटे मोडणाऱ्या नामर्दांचे पारिपत्य करण्यासाठी शिपाई, घोडे इत्यादी फौज काय कामाची? नामर्दाचे पारिपत्य करण्यासाठी मल्लाची जरुरी नसते. मर्दाने मर्दाशीच लढावे हा तुकोबांचा उपदेश आहे.

८ **“शूरा साजती हतियारें। गांढया हांसतील पोरे।।धृ।।**

**काय केली विटंबना। मोती नासिकावांचून।।१ ।।**

**पतिव्रते ते रुप साजे। सिंदळ काजळ लेता लाजे।।२।।**

**दासी पत्नी सुता। नव्हें सरी एक पिता।।३।।**

**मान बुध्दिमंता। थोर न मानिती पिता।।४।।**

**तुका म्हणे तरी। आंत शुध्द दंडेवरी।।५।।”**

शस्त्र शूराच्याच हातामध्ये शोभते तेच नामर्दाने घेतल्यास मुले त्याला हसतात. एखाद्या स्त्रीने नाक सुंदर नसताना मोत्याची नथ घातली तर हास्यास्पद नव्हे काय? रुपवान प्रतिव्रता स्त्रीला डोळ्यांत काजळ घालताना अभिमानच वाटेल आणि व्यभिचारिणीला लाजच, कारण श्रृंगार – पतिव्रतेला शोभतो.औरस व दासीपुत्र एकाच नरजातीच्या पोटी जन्माला येतात. पण श्रेष्ठत्व व समाजमान्यता औरस पुत्रालाच मिळते. बुध्दीवंताला समाजात सन्मान मिळतो, ते वयावर अवलंबून नाही. ज्याचे अंत:करण स्वच्छ असेल त्यालाच चांगला वेष शोभा देईल. अंत:करणच काळेकुट्ट असेल तर नुसता वेश काय कामाचा?

मागील दोन्ही अभंगातून तुकोबांनी तत्कालीन सामाजिक, राजकीय परिस्थितीवर नेमके बोट ठेवले आहे. स्वकियाविरुध्द तलवार उपसून मुस्लीम सत्तेचे रक्षण करणाऱ्या मराठा सरदारांना ह्या त्यांच्या कानपिचक्याच आहेत.नि:स्पृह वृत्तीने जगणाऱ्या तुकोबांनी अभंगाद्वारा व कीर्तनातून राष्ट्रजागृती केली. त्याची कीर्तने शिवसैनिकांसाठी बौध्दिकतेची होती, ज्यांनी वारकऱ्यांत वीरत्व, स्वाभिमान, शौर्य आणि राष्ट्रभक्ती निर्माण केली. या सर्व गोष्टींमुळे छत्रपती शिवरायांना नि:स्वार्थी व चारित्र्यसंपन्न सैनिकांचा कधी तुटवडा पडला नाही.

**पाईकाची आचारसंहिता/सिध्दांत —**

९ **पाईकपणे जोतिला सिध्दांत । शूर धरी मात वचन चित्ती ।।**

**पाईकांवाचून नव्हे कधी सुख। प्रजांमध्ये दु:ख न सरे पीडा।।धृ।।**

**तरि व्हावे पाईक जिवांचे उदार। सकळ त्यांचा भार स्वामी वाहे।।२।।** ६ **( तु.गा.अ.क्र १०६२)**

स्वराज्यामध्ये जर शूर असे सैनिक असतील तरच प्रजा सुखी राहू शकते, अन्यथा प्रजेमधील दु:ख कधीही न संपणारे आहे पाईक इतका आपल्या स्वामीवर किंवा राजावर उदार असतो की, राजाचा सारा भार सैनिकांवर असतो, ज्यांना पाईकाची सेवा करण्याचे सुखच लाभले नाही त्यांचा जन्म वाया गेला.

१० **"पाईक तो जाणे पाईकीचा भाव । लागे पगे ठाव चोरवाट ।।१।। (तु.गा.अ.क्र.१०६४)** ७

वीराची खरी योग्यता वीरच जाणतो, वाटेतील खाचखळगे चोरवाटा या सर्वांची त्याला माहिती असते. आपणाला घाव न लागू देता, आपला मागमूस मागे न ठेवता, आपल्या मनसुब्यांचा शत्रूला पत्ता लागू देत नाही. या रीतीने जो लोकांना आणि स्वामीला माणसांना हाताशी धरून त्यांच्या अंगचे शौर्य, धाडस वगैरे गुण बाहेर पडण्यास अवसर देतो आणि आपल्याप्रमाणे तो त्याला थोरपदाची प्राप्ती करून देतो, ज्याचे असे विशवसू सेवक आहेत तो त्रैलाक्याचा स्वामी होऊ शकेल,

११ **"पाईकांनी पंथ चालविल्या वाटा। पारख्याचा सांटा सांडोनिया।।१।।**

**परखिचे ठायी घेऊनिया खाणे। आपले जन राखियले।।धृ।।**

**आधारे विण जे बोलता चावळे। आपले ते कळे नव्हें ऐंसे।।२।।**

**सांडिता मारग मारिती पाईक। आणिकासी शीक लागावया।।३।।**

**तुका म्हणे विश्वा घेऊनि विश्वास। पाईक तयास सुख देती।।४।।" ( तु.गा.अ.क्र.१०६५)**

आघाडीवरच्या सैनिकांनी उन्नतीच्या मार्गात आड येणारी विघ्ने दूर केली व चांगला मार्ग तयार केला, शत्रूंची ठिकाणे हस्तगत करून स्वजनांचे रक्षण केले, ज्याचा खरेपणा पटत नाही ते निराधार आहे, ग्राहय नाही म्हणून त्याचा त्याग केला, लोकांना सन्मार्गाला लावण्यासाठी वाईट मार्गाने जाणाऱ्यांना शासन केले, भेदभाव न ठेवता सकलांना विश्वासात घेऊन जनतेचे कल्याण साधले, तो खरा पाईक

१२ **“ उच्च निच कैसी पाईकाची ओळी। कोण गांढे बळी निवडिले।।१ ।।**

**स्वामिकाजी एक सर्वस्वे तत्पर। एक ते कुचर आशाबध्द।।धृ।। ( तु.गा.अ.क्र. १०६९)**

पाईकांमध्ये उच्च—नीच असा कोणताही ज्ञातभेद नसून राजाला माहीत असते की कोणता पाईक किती प्रामाणिक आहे त्याचप्रमाणे राजाही त्याचे मोल करतो.

१३ **“एकाच स्वामीचे पाईक सकल। जैसे बळ तैसे मोल तया।।१ ।।**

**तुका म्हणे मरण आहे या सकलां। भेंणे अवकळा अभये मोल।।४।।” (तु.गा.अ.क्र. १०७०)**

तुकाराम महाराज म्हणतात, मरण तर सर्वांनाच आहे. पण मरणाचे भय बाळगल्यास अप्रतिष्ठा होते व अभय राहिल्यास जीवनास मोल चढते.

१४ **“प्रजी तो पाईक ओळींचा नाईक। पोटासाठी एकें जैशीतैशी।।१ ।।**
**आगळे पाऊल आणिकांसी तरी। पळती माघारी तोडिजे ती।।धृ।।**
**पाठीवरी घाय म्हणती फटमर। धडा अंगे शूर मानपावे।।२ ।।**
**होईल देखडा देह तो पाईक। मारी सकळीक सर्वहरी।।३ ।।**
**तुका म्हणे नव्हे बीलांचे कारण। कमाईचा पण सिध्दी पावे।।४।।” ( तु.गा.अ.क्र. १०७१)**

प्रजेच्या सुखासाठी जो मरण पत्करणारा शिपाई असतो, तोच नाईकाच्या थोरवीस पोहोचतो आणि केवळ पोटासाठी लढणारे असतात त्यांना मानही जशास तसा मिळतो. तो मान जेमतेमच असतो, कित्येकजण शत्रूवर चाल करुन वेगळेच पाऊल टाकतात. तर कित्येकजण शत्रूच्या भीतीने माघारी वळून पळत असतात. शत्रूचे हात पाठीवर घेऊन जे पळून येतात ते शिपाई भ्याडच म्हणावेत. व जे धैर्याने सामारे जाऊन शत्रूवर चालून जातात त्यांचाच मान सर्वत्र वाढतो. ८

आपल्या जीवावर उदार होऊन जो पाईक शत्रूवर हल्ला करील, तोच त्याचा पराभवही करु शकेल. त्यालाच जय मिळेल. तुकाराम महाराज म्हणतात, या शूरत्वाच्या गोष्टी नुसत्या बोलायच्या नसतात तर दृढ निश्चय करुन कृतीत आणल्यानेच पाईकाचे सार्थक होते.

**पाईकपणे जोतिला सिध्दांत। शूर धरी मात वचन चित्ती।।** तुकोबांनी पाईकाचे सिध्दांत सांगितले आहेत. पाईकाची आचारसंहिता सांगितली आहे. पाईक हा शूर असतो. शत्रूवर मात करण्याची त्याची वृत्ती सदैव जागृत असते. त्याचे चित्त शत्रूंचा पाडाव करण्याच्याच कामी लागलेले असते. शत्रूंचा पराभव हाच खरेतर पाईकाचा धर्म होय. तुकोबांनी पाईकाचा धर्म लोकांवर बिंबवतांना सिध्दांतांच्या खुणाही सांगितल्या आहेत. **पाईकीवाचून नव्हे कधी सुख। प्रजांमध्ये दु:ख न सरे पीडा।।** पाईकाला खरे सुख लाभते ते युध्दामध्ये शत्रूशी लढतांना. सर्वसामान्य लोक दु:ख आणि पिडांमध्ये गुरफटून असतात.

परंतु पाईकाला रणांगण म्हणजे मुक्तीचे द्वार. अपार सुखाचे द्वार. **तरी व्हावे पाईक जिवाचे उदार। सकळ त्यांचा भार स्वामी वाहे।।** पाईकाने जीवाचे उदार व्हावे हाच त्याचा धर्म आहे.

पाईकाने आपले पूर्ण लक्ष आपल्या धर्मावर आणि कार्यावर केंद्रित केले पाहिजे. स्वामीप्रतीचे पाईकाचे समर्पण हेच त्याच्या जीवनाचे अंतिम ध्येय असावे. **पाईकीचे सुख जया नाही ठावे। धिग त्यांनी ज्यावे वायाविण।।** ज्यांना पाईकाचे परमोच्च सुख कळत नाही, अशा पाईकांचे जीवन धिक्कार करण्यासारखे असते. व्यर्थ आणि वाया जाणारे असते. **तुका म्हणे एका क्षणाचा करार। पाईक अपार सुख भोगी।।** तुकोबांनी या दोन चरणात, पाईकाच्या जीवनाचे श्रेष्ठ रहस्य सांगितले आहे. शत्रूशी लढतांना जीवावर आघात झाल्यावरही, पाईक मात्र शत्रूंचेच शिरच्छेदन करण्यासाठी प्राणपणाने लढतो. मरतांनाही शत्रूंचा नि:पात करण्याचेच धाडस दाखवतो. तो एका क्षणाचा करार ज्यात केलेला असतो, अशा पाईकाला लाभणारे मरणसुखही मोक्षापेक्षा श्रेष्ठ असते.

**तुकोबांनी पाईक या शब्दाचा व्यापक अर्थ सांगितला आहे. त्यांचा पाईक हा देवाचा सेवक आहे, तसाच तो शिवाजीचाही सेवक आहे, शिपाई आहे, सैनिक आहे, योध्दा आहे, शिवाजीसारखा धुरंधर पराक्रमी राजाही आहे, नायकही आहे**, सेवक आणि शिपायाने स्वामीप्रती इमान राखावे, कोणत्याही मोहात न गुरफटता आपल्या स्वामीसाठी जीवाचे बलिदान दयावे, पाईकाचे अपार सुख भोगावे, तुकोबांचा पाईक हा बळिया आहे.

या सर्व पाईकाच्या अभंगावरुन असे लक्षात येते की, शिवराय व त्यांचे स्वराज्य साधनेचे कार्य व त्यासाठी तळहातावर शीर घेऊन निघालेले वीर, शिपाईगडी यांच्यासाठीच हे अभंग तुकोबारायांनी लिहिले आहेत हे निश्चित. आपल्या उपदेशाने त्यांना स्वदेशकार्यासाठी तुकोबांनी उत्तेजित केले, व शिवरायांच्या हातातूनच राष्ट्रोध्दार होणार याची त्यांना खात्री होती.

**स्वराज्यस्थापनेत पाईकीच्या अभंगाचे योगदान**

संत तुकारामांच्या अभंगातील मावळे हे वारकरी होते. देशातील सर्व शेतकऱ्यांप्रमाणेच या शेतकऱ्यांनाही लावण्या व पोवाडे गाण्याचा छंद होता. मावळप्रांतात सहज जरी हिंडून आले तरी आपल्याला तुकोबारायांचे परंपरेने आलेले कित्येक अभंग व अभंगपर पोवाडे मावळ्यांच्या तोंडून ऐकायला मिळतात, या मावळ्यांचे धर्मवाङ्मय म्हणजे तुकोबांचे अभंग होत.

खरा शूर शिपाई हा ऐकीव व पारमार्थिक युध्दात सारखाच पराक्रम गाजवतो. पराक्रम किंवा शौर्याशिवाय दैन्य दूर होत नाही. शिपायांनी आपले प्राण अर्पण केले पाहिजेत. म्हणजे बाणांच्या व बंदुकीच्या गोळ्यांचा सारखा वर्षाव होत असताना जो आपल्या धन्याचा बचाव करतो त्यास शाश्वत सुख लाभते. शूरालाच शूरास ओळखता येते व त्यालाच त्याच्याबद्दल आदर वाटतो शरीर पोषणार्थ जे

शस्त्र चालवितात ते केवळ भाडोत्री शिपाई होत. कठीण प्रसंगी खरे शिपाईच उपयोगी पडतात. संसारातील शिपाई व परमार्थातील शिपाई यांना उपदेश करण्याच्या उद्देशानेच संत तुकारामांनी पाईकाचे अभंग लिहिले असावेत.

**"युध्द करावया सामर्थ्य आणावे। तरीच म्हणावे क्षत्रिय त्यासी।।**

**तुका म्हणे होई शूरा किंवा निसूर मजूर।।"**

जो युध्दावर जाईल, शौर्य गाजवून पराक्रम करील तोच खरा क्षत्रिय. येथे जातीची आडकाठी नाही. या तत्वाचा त्यांनी पुरस्कार केला. सर्व जातीजमातींच्या लोकांत शौर्य निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. देव, धर्म, सुख, शांती यासाठी स्वातंत्र्य हवे. शूरत्वाने, प्राणाच्या मोलाने स्वातंत्र्य मिळविले पाहिजे, तरच धर्मही राखला जाईल, असे तुकोबा तळमळीने आपल्या पाईकाच्या अभंगातून अधिकारवाणीने तरुणांना सांगतात. महाराष्ट्रातील तरुणांच्या ताज्या रक्तात स्वदेशाभिमानाची व धर्माभिमानाची उकळी आणली. त्यांनी केवळ काव्य म्हणून वहीत बंदिस्त करुन ठेवले नाही. आपली राष्ट्रोध्दारक व स्वधर्माभिमानी वाणी असंख्य — तरुणांच्या अंत:करणात पध्दतशीरपणे ओतण्याचे कार्य त्यांनी सतत केले. त्यामुळे महाराष्ट्र त्या पडत्या काळात स्वातंत्र्यासाठी झगडण्यास सिध्द झाला.

**संत तुकारामांचा छत्रपती शिवरायांना उपदेश:—**

छत्रपती शिवरायांनी बालपणीच मातोश्री जिजाऊकडून रामायण, महाभारतातील गोष्टी ऐकल्या होत्या, धर्म साधूसंत यांच्याविषयी शिवरायांच्या मनात खूप आदर होता.

'हिंदू धर्माच्या रक्षणासाठी आम्ही फकिरी घेतली.' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. आपल्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याला साधुसंतांचा आशीर्वादात्मक पाठिंबा असावा असे शिवरायांना वाटत असे. ते स्वत: अनेक सत्पुरुषांच्या दर्शनास जात. तुकाराम महाराजांची छत्रपतींवर पूर्ण कृपादृष्टी होती. संत तुकारामांच्या क्षात्रधर्म पालनाच्या उपदेशाने प्रेरित होऊन त्यांच्याबद्दल आदर वाढल्याने तुकारामांचा सन्मान करण्यासाठी शिवरायांनी त्यांच्याकडे दिवट्या, छत्री, घोडे या इतमामासह काही धनही पाठविले, सत्कार करण्यासाठी त्यांनी स्वदस्तुराचे पत्र पाठवून निमंत्रण दिले, परंतु तुकोबारायांनी शिवरायांनी पाठविलेल्या इतमामाचा, धनाचा व सन्मानाच्या आमंत्रणाचाही स्वीकार केला नाही.

कर्जखाते इंद्रायणीत बुडवून ज्यांनी सावकारी सोडून दिली. दुष्काळ पीडितांना साहाय्य करताना ज्यांनी स्वत:च्या संसाराचा विचार केला नाही. जाणूनबुजून ज्यांनी दारिद्र्य स्वीकारले, त्या तुकोबारायांनी शिवरायांनी पाठविलेले धन आणि मानसन्मान स्वीकारला नाही हे त्यांच्या स्वीकृत ध्येयवादाला शोभेसे होते, तुकोबांनी घेतलेल्या दारिद्र्याच्या व्रताशी 'दिवट्या, घोडे, छत्री', हा इतमाम विसंगत होता. इतरांना साध्या, निर्लोभी व प्रामाणिक राहणीचा उपदेश करण्यापूर्वी त्यांनी स्वत: ती पत्करली होती व इतरांना धडा घालून दिला होता. वस्तुत: दारिद्र्यव्रताची सांगता करुन आयुष्याच्या

अखेरच्या काळात वैभवात राहण्याची संधी तुकोबांकडे आपण होऊन आली होती. पण ती या निग्रही, विरक्त आणि नि:स्पृह पुरुषाने घेतली नाही. त्यांना या कशाचाही मोह पडला नाही. शिवरायांनी पाठविलेले धन व सन्मान स्वीकारण्याचे नम्रपणे नाकारुन तुकोबांनी शिवाजी महाराजांच्या पत्रास अभंग रुपातून यथोचित उत्तर पाठविले.

**“दिवट्या छत्री घोडे। हे तो बऱ्यात न पडे।।**
**आता येथे पंढरीराया। मज गोविसी कासया।।**
**मान दंभ चेष्टा। हे तो शूकराची विष्ठा।।**
**तुका म्हणे देवा। माझे सोडविणे धावा।।” (तु. गा. १८८४)**

मान, दंभ, चेष्टा या गोष्टी मला डुकराच्या विष्ठेप्रमाणे वाटतात, तुकाराम महाराज पांडुरंगाला म्हणतात, असल्या मोहातून मला सोडव. “तुका म्हणे धन। आम्हां गोमासासमान।।” (तु. गा. १८९३)
आम्हाला धन हे गोमासाप्रमाणे वाटते.

संत तुकाराम इ.स. १६५० (शके १५७२) साली वारले. व इ.स. १६४९ साली शिवाजींनी तोरणा किल्ला काबीज केला व महाराष्ट्राचे राजे होण्याचा उपक्रम सुरु केला. या महत्त्वाच्या तारखा लक्षात घेतल्यानंतर तुकारामांची व छत्रपतींची भेट झाली असावी हे लक्षात येते. त्यांच्या भेटीबद्दल परंपरागत आख्यायिकेस ऐतिहासिक कागदपत्रांचा आधार नसता व ही नुसती अख्यायिका राहिली असती तर ही एक दंतकथा आहे असे सर्वांनी मानले असते परंतु संशोधनाने हे सिध्द होते की — तुकारामांनी शिवाजींना उपदेश करण्यासाठीच पाईकीचे अभंग लिहिले आहेत. यावरुन त्यांची भेटही एक ऐतिहासिक सत्य ठरते.**९**

राजे आणि तुकाराम यांची भेट झाली त्यावेळी तुकारामांनी आपल्या अभंगात म्हटले—

**स्वामीकाज गुरुभक्ती। पितृवचन सेवा पती।। १।।**
**हेची विष्णुची महापूजा । अनुभव नाही दुजा।।धृ।।**

राजांनी मोठा नजराणा तुकोबारायांना पाठवला ही हकीगत प्रसिध्द आहे.तो नाकारुन तुकाराम म्हणतात—

**मुंगी आणि राव । आम्हा सारखाचि जीव ।। १।।**
**गेला मोह आणि आशा। कळिकाळाचा हा फांसा ।। २।।**
**सोने आणि माती । आम्हा समान हे चिती।। ३।।**
**तुका म्हणे आले । घरा वैकुंठ सगळे।। ४।।** (तु.गा.अ.क्र.१८९५)

तुकाबांनी राजांना दोन उपदेशाच्या गोष्टी सांगितलेल्या दिसून येतात.त्यांचा सारांश असा आहे की तुम्ही पूर्व जन्मीच सारा परमार्थ करुन मोकळे झालात आम्ही या जन्मी साधना करत आहोत.

**युक्तीचा बालक ब्रम्हनिष्ठ ज्ञानी। गुरुभक्ती मनी विश्वासेसि।।**
**शिव तुझे नाम ठेवले पवित्र । छत्रपती सूत्र विश्वाचे की।।**
**सांगणे नलगे सर्वज्ञ तू राजा।अनाथांच्या काजा साह्य व्हावे।।**
**आत्मारामी मन ठेवूनिया आहे। सामदासी पाहे आपणेया।।** (तु.गा.अ.क्र.१८८९)

तुकारामांना राजांच्या कार्याची महती पटली होती.राजांचे वाढते सामर्थ्य ते अनुभवत होते.त्यामुळेच एकाच ध्येयासाठी अविरत परिश्रम करणारे हे दोन महापुरुष एकमेकांस अनुकूल होते. तुकारामांची प्रेरणा राजांना उपकारक होत होती. ज्या 'श्रीमंत योगी'पुरुषाने हिंदुस्थानात स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलीत केली हिंदुसमाजाला शक्ती व प्रेरणा दिली त्या युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि तुकोबारायांचा चिकित्सक आणि तौलनिक परामर्श घेण्याचा प्रयत्न या लघुशोध प्रकल्पाचा उद्‌देश होता.

शिवरायांच्या ठायी पराक्रमाबरोबरच जी एक उदात्तता आणि नैतिक उंची होती ती इतर वीरांमध्ये आढळत नाही.सुमारे साडेतीनशे वर्षे गुलामगिरीच्या अंधारात चाचपडणाऱ्या हिंदूना स्वातंत्र्याचा प्रकाश शिवरायांनी दाखविला.तीव्र बुध्दिमत्ता व स्वराज्य स्थापनेची महत्त्वाकांक्षा,असामान्य धैर्य,सदैव जागरुक वृत्ती,अव्वल दर्जाची मुत्सदेगिरी, सर्वधर्मीयांविषयीचा आदर,सेवकांच्या गुणांची जाणीव,वृत्तीची उदारता,कडक शिस्त, सहकाऱ्यांबद्दल प्रेम आणि न्यायावर आधारलेली राज्यव्यवस्था अशा राजांच्या गुणांचा आदर्श आजही सर्वांना प्रेरणा देणारा आहे.राजा कसा असावा याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे छत्रपती शिवजी महाराज! उदात्त चारित्र्य आणि परधर्मसहिष्णुता यांचे धडे शिवाजीमहाराजांनी दिले.

**काशीजीकी कला जाती । मथुरा मस्जीद होती।**

**यदि शिवाजी न होते। तो सुन्नत होती सबकी।**

भूषण कवीच्या या पंक्तीतून वस्तुस्थितीचे प्रखर असे दर्शन होते. छत्रपती शिवाजीमहाराज हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण भारताचे आदरणीय दैवत मानले जाते.सतराव्या शतकात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्राच्या एका कोपऱ्यात स्वराज्याची स्थापना केली आणि केवळ पाऊणशे वर्षात या स्वराज्याच्या रोपट्याचे साम्राज्यवृक्षामध्ये रुपांतर झाले.

समर्थशिव यांच्याशी तुकारामांचा आलेला संबंध, शिवछत्रपतींना आक्रमकांपासून वाचविण्यासाठीची दिव्य आख्यायिका,महाराष्ट्रातील आधुनिक विचारांना—भाषा संस्कृती ,समाज,अर्थकारण आणि न्याय—बळ देणाऱ्या तुकारामांच्या काव्यातील उक्ती,भागवत धर्मप्रसारामुळे समूहमनाची तुकारामांवरील वर्धिष्णूश्रध्दा या सगळ्यागोष्टी विचारात घेऊन महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये, जडणघडणीत श्री तुकारामांचा पायाभूत वाटा आहे.

तुकारामांनी शिवछत्रपतींनी पाठवलेले वैभव परत पाठवून उपदेश करणे यातील तुकारामांची इह जीवनाविषयीची विरक्ती, परचक्राविषयी त्यानी केलेले बोधन,शोषणाविषयी केलेले परखड निर्भत्सन आणि कीर्तनप्रसंगी शिवछत्रपतींचे नाट्यमय रितीने कलेले संरक्षण यामुळे लोकमानसात तुकारामांना अभिप्रेत असलेल्या शिवसमर्थप्रणित हिंदुपदपादशाही विषयी स्वत्वात्मक आसक्ती निर्माण झाली. तुकाराम आणि छत्रपती यांचे संबंध किती होते, त्यांच्या भेटी कधी झाल्या, तुकारामांना कोणता धर्म अभिप्रेत होता; यांची बौध्दिक चिकित्सा होते आणि होत राहील.पण शिवछत्रपतींना लोकमानसातील 'तुकाराम श्रध्देचा' खूप फायदा झाला हे नाकारता येत नाही.तसेच वर्तमानातील राजकीय,सामाजिक संघटनांना महाराष्ट्राची आस्मिता जागृत करतांना,काही राजकीय व्हूह रचतांना लोकमानसातील तुकाराम केंद्रिततेचा उपयोग झाला हे सिद्‌ध होते. १०

महाराष्ट्राला ‘दुर्गांचा देश’ म्हटले जाते. या देशाला सिंधुसागराची किनार, सह्य पर्वताच्या रांगा आणि त्यापलीकडे विस्तृत पठार लाभले आहे. सातवाहनांपासून मराठ्यांपर्यंत या देशात दुर्गबांधणी झाली. वाकाटक, कलचुरी, आभीर, सेंद्रक, राष्ट्रकूट, शिलाहार, यादव, मराठे या राज्यकर्त्यांनी आपल्या राजवटीत ही दुर्गबांधणी केली. वेगळ्या खंडातील, वेगळ्या देशांच्या, राजांच्या, वंशाच्या, धर्माच्या लोकांनी केलेले दुर्गनिर्मितीचे महाराष्ट्र हे एकमेव उदाहरण असेल.

या दुर्गसंपदेचा सगळ्यात मोठा आणि उत्तम उपयोग छत्रपती श्रीशिवाजी महाराजांनी केला. त्यांनी स्वत: बांधलेल्या दुर्गांची संख्या फार मोठी नाही परंतु साल्हेरपासून जिंजीपर्यंत सुमारे २६० दुर्ग ताब्यात आणून स्वराज्य शाश्वत केले आणि त्याच्या सरहद्दीही विस्तारल्या. सह्याद्रीच्या मोठ्या आधाराने शिवाजी महाराजांनी आपली स्वराज्याची संकल्पना अस्तित्वात आणली.

सह्याद्रीचे दुर्ग आणि मराठे यांच्या पराक्रमाचे उत्तम वर्णन सर रिचर्ड टेंपल यांच्या १८८२ च्या लंडनमधील ‘रॉयल जिऑगाफिकल सोसायटी’ येथील भाषणात व तुकोबारायांच्या अभंगातही सापडते.

महाराष्ट्रातील या दुर्गसंपदेत प्रामुख्याने गिरिदुर्ग, स्थलदुर्ग, वनदुर्ग, बेटांवरचे दुर्ग म्हणजे जंजिरे आणि किनारी दुर्ग आहेत. साल्हेरसारखा उत्तुंग दुर्ग आहे तर कंधारसारखा उत्तम स्थलदुर्ग आहे. वासोट्यासारखा वनदुर्ग आहे तर सिंधुदुर्गासारखा बेटावरचा दुर्ग आहे. अलीबाग—विजयदुर्गसारखे किनारी दुर्ग आहेत. अर्थात अलीबागेचा कुलाबा किल्ला मिश्रदुर्ग आहे. रायगडासारखा प्रमुख दुर्ग आहे. तर सोनगडलिंगाण्यासारखे उपदुर्ग आहेत. दुर्गांची वैशिष्ट्ये तुकोबाराय सांगतात. बुरुज, तटबंद्या, चर्या, जिने तळघरे, इमारती, दरवाजे, त्यावरची शिल्पे, शिलालेख, मंदिरे, तळी, पाण्याच्या टाक्या अशा विविध प्रकारच्या गोष्टी दुर्गांवर असतात. स्थलदुर्गाला खंदक आवश्यक असतो नाही तर त्याला गढी संबोधावे लागते. आजही गढ्या फार विस्तृत प्रमाणात दिसतात.

आज अनेक दुर्गांच्या वाटा मोडल्या आहेत, दुर्गापर्यंत पोहोचण्याचे रस्तेही नाहीत. पायऱ्या तुटलेल्या दिसतात, पाण्याच्या टाक्या कोरड्या आणि कचऱ्याने भरलेल्या दिसत आहेत.

देशाच्या, प्रदेशाच्या किंवा वसतीस्थानाच्या रक्षणासाठी किल्ला किंवा तटबंदीचे महत्व तुकोबाराय ओळखतात.किल्ल्यांना असलेल्या तटबंद्या, बुरुज, दरवाजे, त्यावरील इंद्रकील (खिळे), खंदक, रेवण्या, जंग्या, कितीही मजबूत असल्या तरी किल्ला अखेरीस लढवावा लागतो तो त्या सैनिकांच्या, मावळ्यांच्या इमानावर, विश्वासावर, शौर्यावर, श्रध्देवर आणि त्यांच्या मनोबलावर. सैनिकांच्या पोलादी मनगटांमागे त्या किल्लेदाराची निधडी छाती ढालीसारखी उभी असावीच लागते, तरच तो किल्ला लढवू शकतो. हे तुकोबाराय ओळखून होते.

किल्ल्यांना खऱ्या अर्थाने मिळालेले वैभव व अनन्यसाधारण महत्व हे शिवकालामध्ये मिळाले.
शिवरायांचा जन्म किल्ल्यावर झाला, राज्याभिषेकही किल्ल्यावरच केला आणि चिरविश्रांतीही किल्ल्यावरच घेतली. किल्ल्यांच्या सहाय्याने स्वातंत्र्य मिळवून स्वराज्याची व सुराज्याची स्थापना केली. शिवरायांनी बांधलेल्या किल्ल्यांची रचना व स्थापत्याचा अभ्यास केल्यास चकीतच होण्याची वेळ येते.

तुकोबारायांनी सामाजिक विषमतेला पायबंद घालण्यासाठी व्यापक प्रबोधन प्रकल्प हाती घेतला होता.शिवरायांना अशा सामाजिक प्रबोधन प्रकल्पासाठी लागणारी सवड नव्हती.परंतु ही बाजू

संतांनी सांभाळली.छत्रपती शिवरायांचा राष्ट्रवाद केवळ गडकिल्ले जिंकण्यापुरता मर्यादित नव्हता. कल्याणकारी राष्ट्राची निर्मिती करण्यासाठी राजकारण,प्रशासननीति याबरोबरच समताधिष्ठित समाजाची बांधणीही करावी लागते यांची त्यांना जाणीव होती,त्यामुळेच ते तुकारामांनी सामजिक विषमतेवर अंधश्रध्दांवर आणि पाखंडीपणावर घाणाघाती हल्ले करुन समतेची लढाई केली.वर्णजातीनिरपेक्ष मूल्यदृष्टीतून समाजाला संघटित करण्यासाठी पंढरीचा विठोबा या एकाच दैवताच्या छत्राखाली अठरापगडजातीच्या लोकांना एकत्र आणण्याचा उपक्रम तुकारामांनी केला.शिवरायांच्या महाराष्ट्र धर्माच्या उभारणीतील सामाजिक समतेच्या रचनात्मक कार्यक्रमाची पताकाच जणू आपल्या खांद्यावर घेतली होती. राष्ट्रधर्म आणि भागवत धर्म हे परस्परांना पूरक कसे आहेत ते अभंगातून मांडून जागृती केली. राजशासकाची जबाबदारी आदर्श राजनीति,राज्यकारभारविषयक लोक व्यवहाराचे स्वरुप,जनतेची तत्संबधीची धारणा,प्रशासन अधिकाऱ्यांची प्रामाणिक वृत्ती इ.संबधी तुकोबाराय फारच साक्षेपी विचारवंत ठरतात. स्वामीसेवेची निष्ठा, पाईकत्त्व, सेवेचे स्वरुप, राष्ट्रसेवेचे फल, तत्त्वनिष्ठा, राष्ट्रभक्तीसंबधीचे तुकोबारायांचे अभंग चिंतनीय आहेत. माणसाच्या मन:स्थितीचे स्वरुप व व्यक्तीविशेषाचे तसेच सामुदायिक मानसिक चिंतनास अनुसरुन अभंगातून केलेला उपदेश व संवाद फारच महत्त्वाचा ठरतो.

अभंगरचना हे श्रीतुकारामांचे अक्षरकाव्यकर्तृत्व आहे. १) सांप्रदायिक २) प्रासंगिक ३)स्फुट असे रचनेचे स्थूल वर्गीकरण करता येईल. चिंतन,भजन,कीर्तन या स्वरुपात त्यांचे भक्तिवाङ्मय प्रकट होत राहिले

संपूर्ण जगभरामध्ये महत्वाची व्यक्तिमत्वे म्हणून छत्रपती शिवाजी महाराज व संत तुकाराम महाराज यांची ओळख आहे. समाजाविषयी जे खोलवर भाष्य करतात व आपल्या प्रजेला न्याय अधिकार मिळवून देतात.जनतेकडे चौफेरे दृष्टीने पाहतात व संत तुकारामांच्या विचारांना ते आपल्या आचरणात आणतात. कृतीव्दारे ते सिद्ध करतात. छत्रपती शिवाती महाराज आणि त्यांच्या जीवाला जीव देणारे सरदार व विश्वासू मावळे यांना उद्देशून पाईकाचे अभंग लिहिले आहेत. नुसतेच पाईकाचे अभंग नाहीत तर आपल्या कीर्तनातूनही चारित्र्यवान मावळे घडवले आहेत. शिवाजी जसे जननाडीचे परीक्षक होते,तसेच तुकोबाही जननाडीचे तज्ज्ञ असे वैदय होते. पाईकांना त्यांचा क्षात्रधर्म सांगतात, धर्माचा आणि परमार्थाचाच आधार त्यांनी दिला. पाईक कसा असावा याचा आदर्श सांगतात तुकोबा म्हणतात,

**पाईक तो जाणे पाईकीचा भाव । लाग पगे ठाव चोर वाटा ।।**
**आपण राखोनि ठकावे आणीक । घ्यावे सकळिक हरुनिया ।।**
**येऊ नेदी लाग लागो नेदी माग। पाईक त्या जगी स्वामी मानी।।**
**ऐसे जन केले पाईके पाईक। जया कोणी भीक न घालिती।।**
**तुका म्हणे ऐसे जयाचे पाईक। बळिया तो नाइक त्रैलोकीचा।। (तु.गा.अ.क्र.१०६४)**

शिवाजींनी पाईकांसाठीचा उपदेश पूर्णपणे आत्मसात केला होता. शिवाजींच्या शूर मर्द शिपायांनी, सरदार, स्वामीनिष्ठावानांनीही तुकोबांचा पाईकांचा उपदेश आपल्या प्रत्यक्ष जगण्यातून पुढे साकार केल्याच इतिहास आहे. तुकोबांनी पाईकांचा जो धर्म सांगितला आहे, त्या धर्माला जागणारे मावळे, तुकोबांच्याच प्रदेशात तयार झाले. शिवाजींनाही मराठा स्वराज्यनिर्मितीचे स्वप्न साकार करता आले. हा सर्व भूतकालीन इतिहास लक्षात घेतला की, तुकोबांचे पाईकाचे अभंग शिवकाळात किती मौलिक ठरले होते, हे लक्षात येते.

शिवाजी आणि त्यांच्या शूर मावळ्यांनी शिवकाळात तुकोबांच्या पाईकनिर्मितीच्या सर्वच खाणाखुणा आपल्या अविस्मरणीय पराक्रमातून पूर्णपणे सिध्द केल्या होत्या, हे कुणालाही नाकारता येणारे नाही.शिवाजींनी शूर मावळ्यांच्या मदतीने मराठा स्वराज्य निर्माण केले: तर तुकोबांनीही पाईकाच्या सिध्दांतांची निर्मिती केली.कीर्तनातून त्याचा मावळप्रांतात प्रसार केला.मावळ्यांमध्ये मानसिक,शरीरिक आणि नैतिक धैर्य निर्माण केले.

तुकारामांनी लोकांमधील श्रध्दा जागविली, त्यांना इतिहासाच्या साक्षीने जागे केले.अत्याचाराची दहशत निर्माण करीत,धर्म बुडवीत,बायाबापड्यांना भ्रष्ट करीत आलेल्या आक्रमकांना सामूहिकपणे आणि आत्मविश्वासाने सामोरे गेले तरच निभाव लागेल असे तुकारामांना वाटते'राजा प्रजापीडी'त्यामुळे क्षेत्री दुश्चिती निर्माण झाली आहे.हरिकीर्तनातून त्यांचे मनोधैर्य वाढवून त्यांना विराट पुरुष स्वरुपात उभे करता येईल याविषयी श्री तुकारामांना विश्वास आहे.

परचक्रापासून वाचवण्यासाठी,अस्थिर राजस्थिती देव,देश आणि धर्म जागवणाऱ्या संरक्षक छत्रपतींच्या पाठीशी पुरुषार्थाने लोकशक्ती उभी केली. शूर सैनिकांना उद्देशून लिहिलेले अभंग वीररसपूर्ण आहेत. तुकोबांनी या पाईकीच्या अभंगात आपल्या तेजस्वी वाणीने अत्यंत स्पष्ट व निर्भिड शब्दांत राजकारणाचे सिध्दांत सांगितले आहेत. तुकोबांची वाणी मेघगर्जनेसारखी गंभीर, आकाशासारखी निर्मळ व सूर्यासारखी ओजस्वी आहे. देवाला आळविण्यात, दांभिकांचे वाभाडे काढण्यात त्यांच्या वाणीत ती तेजस्वीता आहे तीच राजकारणविषयक पाईकीच्या अभंगातील उपदेशात आहे.

भक्ती आणि वैराग्य हा तुकोबारायांचा स्थायीभाव होता. परधर्मीय सत्तेच्या पीडेपासून मुक्ती मिळावी अशी त्यांची अंतरी धडपड होती. पाईकीचे अभंग लिहून रणवीर मावळ्यांना जशी त्यांनी चेतना दिली, त्याप्रमाणे परकीय जुलमी सत्तेविरुध्द झगडण्यासाठी, दुष्टांचा बिमोड करण्यासाठी, धर्मरक्षणासाठी शिवरायांना प्रेरणा दिली. महाराष्ट्रात क्षात्रतेजाचे स्फुल्लिंग फुलविले. तुकोबांच्या या राष्ट्रकार्याकडे दुर्लक्ष न करता, स्वराज्य स्थापनेतील योगदानातील एक महत्त्वाचे कार्य म्हणून सिध्द होते.तुकारामांचे साहित्य भक्तीवाङ्मय,लोकवाङ्मय आणि अभिजात वाङ्मयाचे सामर्थ पाईकांमध्ये प्रकट करते,एवढेच नाही तर चैतन्याचे स्वयंस्फूर्त,स्वसंवेदय आविष्काररुप घडवते

## संदर्भ व टीपा


१. पु. ग. सहस्त्रबुध्दे बहामनी काळातील महाराष्ट्राचे नेतृत्व, संतकार्य चिकित्सा, वसंत वर्ष ३४, अंक १ जानेवारी १९७६ पृ. १७

२. डॉ. किशोर सानप, 'समग्र तुकाराम दर्शन', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती २००८, पृ. ५९

३. डॉ. सदानंद मोरे, 'तुकाराम दर्शन', गाज प्रकाशन, अहमदनगर, प्रथम आवृत्ती १९९६

४. जांगळे बाळासाहेब, संत तुकाराम जीवन आणि कार्य पृ. ५०

५. संत तुकारामांचे पाईकाचे अभंग हे 'तुकारामांची अभंगगाथा', महाराष्ट्र शासन ग्रंथ भंडार, पुरुषोत्तम लाड, यांच्या संपादन गाथेतील आहेत.

६. तत्रैव व अभंग क्रमांक १०६२

७. तत्रैव व अभंग क्रमांक १०६४
८. तत्रैव व अभंग क्रमांक १०७१
९ श.द.रानडे, (अनुवादक : प्रा. कृ. वे. गजेंद्रगडकर, संतश्रेष्ठ तुकाराम : चरित्र व तत्त्व, महाराष्ट्र ग्रंथ भांडार, कोल्हापूर पृष्ठ ८१०)
१०. डॉ. अनिल सहस्त्रबुध्दे, लोकी अलौकिक श्री तुकाराम, संत तुकाराम अध्यासन पुणे विद्यापीठ प्रथम आवृत्ती २०१२ पृ. १३९

## संदर्भ ग्रंथ


१ श्रीछत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र (पूर्वाध व उत्तरार्ध) वा. सी. बेन्द्रे, १९७२.

२ मराठा इतिहास व्याख्यानमाला, पुष्प २ रे न. र. फाटक, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७२.

३ श्रीशिवदिग्विजय, श्रीशिवाजी महाराजांच्या चरित्राची बखर, संपादक — रा. चिं. ढेरे, अनमोल प्रकाशन, पुणे १९७५.

४ वा. कृ. भावे, शिवकालीन महाराष्ट्र, भावे प्रकाशन.

५ सावंत बी. बी. ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे १९९२.

६ पटवर्धन वा. ब. (संपादन) :— तुकाराम यांच्या अभंगाची चर्चा, खंड १ व २ केळकर ग. ह.

७ परळकर लक्ष्मण :— तुका म्हणे — अमृतधारा, तुकारामांच्या निवडक अभंगावर प्रवचने.

८ पिंगे श्री. म. आणि गजमल माळी :— तुकारामांचे निवडक अभंग व्हिनस प्रकाशन. (संपादन)

९ मोडक (म. गो.) संग्रही अभंग :— अभंगवाणी — अर्थसहिंत अभंग (१७८ नं गोडबोले प्रबंध)

१० रानडे रा. द. :— तुकाराम वचनामृत पुणे व्हिनस प्रकाशन ३ री आवृत्ती

११ सरदार गं. वा. :— तुकाराम दर्शन अभंगवाणी तुक्याची (संपादन)

१२ अभ्यंकर शंकर :— संत तुकारामांचा भक्तियोग खंड — ४

१३ आजगावकर ज. र. :— संतश्रेष्ठ तुकाराम भारत गौरव ग्रंथमाला.

१४ इर्लेकर सुहासिनी :— तुकारामांची प्रभावळ, साकेत प्रकाशन.

१६ केळकर के. स. :— तुकारामांच्या गाथेचा अभ्यास.

१७ चित्रे. दि. पु. :— पुन्हा तुकाराम.

१८ जाधव रा. ग. :— आनंदाचा डोह.

१९ तुकाराम गाथासार :— (हिंदी अनुवाद) — नवी दिल्ली संत साहित्य प्रकाशन.

२० जोशी स. कृ. :— तुका झालासे कळस कॉन्टिनेण्टल प्रकाशन.

२१ तुळपुळे शं. गो. :— तुकाराम अंतरंग दर्शन, बेळगाव.

२२ दांडेकर गो. नी. :— संत तुकाराम, पुणे चित्रशाळा प्रकाशन (तुका आकाशाएवढा)

२३ लाड पु. म. :— तुकाराम चरित्र.

२४ डॉ. आ. ह. साळुंखे :— विद्रोही तुकाराम.